16 SEP 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संत तुकाराम आणि कबीर यांच्या विचारांची समाजाला गरज : कुलगुरू




**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

संत तुकाराम आणि संत कबीर यांच्या विचारांची आजच्या समाजाला मोठी गरज असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र आणि मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विचारशलाका' त्रैमासिकाच्या 'संत तुकाराम व संत कबीर विचारविश्व विशेषांका'च्या प्रकाशन सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर उपस्थित होते. यावेळी 'विचारशलाका'चे संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त कुलगुरूंच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

कुलगुरू डॉ. कामत यांनी संत तुकाराम आणि संत कबीर यांच्या साहित्याचे तसेच त्यांच्या सामाजिक चळवळीतील योगदानाचे महत्त्व स्पष्ट करताना 'विचारशलाका'च्या माध्यमातून वैचारिक साहित्याची निर्मिती व प्रसार करण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले. संत तुकाराम आणि कबीर यांनी समाजातील रूढी, विषमता आणि कर्मकांडावर प्रखर प्रहार करत समता, बंधुता आणि मानवतावादी मूल्यांची मांडणी केली. त्यांच्या साहित्याचा आणि सामाजिक विचारांचा आजच्या बदलत्या समाजव्यवस्थेतही मोठा संदर्भ आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी संत तुकाराम आणि कबीर यांच्या साहित्याचा समाजजीवनावर पडलेला प्रभाव विषद केला. या दोन्ही संतांची वैचारिक व सैद्धांतिक मांडणी स्पष्ट करताना त्यांनी त्यांच्या विचारांमधील सामाजिक समतेचा आग्रह अधोरेखित केला. तसेच सूफी परंपरा आणि वारकरी परंपरेच्या संदर्भात कबीर आणि तुकाराम यांचे महत्त्वही स्पष्ट केले.

डॉ. नंदकुमार मोरे यांनी संत तुकाराम आणि कबीर यांनी लोकभाषेच्या माध्यमातून व्यापक समाजाशी साधलेला संवाद हा त्यांच्या साहित्याच्या प्रभावाचा महत्त्वाचा घटक असल्याचे सांगितले.

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी 'विचारशलाका'च्या प्रवासाची माहिती दिली. तसेच, समाजात चिकित्सक आणि विवेकशील विचारांची निर्मिती करण्यासाठी वैचारिक साहित्याची भूमिका महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमास राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले.


1 6 SEP 2026

पुण्यनगरी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवीन शिक्षण धोरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त : डॉ. ज्योती जाधव

कोल्हापूर : नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे शिक्षण क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणारे असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या प्रायोजकत्वाखाली देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने 'नवीन शिक्षण धोरण २०२० अंतर्गत इंडियन नॉलेज सिस्टीम, व्हॅल्यू एज्युकेशन कोर्स, स्किल एनहान्समेंट कोर्स, व्होकेशनल स्किल एनहान्समेंट कोर्स, ऑन-द-जॉब ट्रेनिंग, फिल्ड प्रोजेक्ट, रिसर्च प्रोजेक्ट आणि इतर संलग्न घटकांची प्रभावी अंमलबजावणी' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशन, कोल्हापूरचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम होते. डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, नवीन शिक्षण धोरण लवचिक असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात ज्ञान व कौशल्य संपादन करण्याची संधी देते. पदवी शिक्षणासोबत रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करण्यावर या धोरणात भर देण्यात आला आहे.

प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक व प्रशासकीय कार्याचा आढावा घेतला. सदर विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे, आय.क्यू.ए. सी.चे व एन.ई.पी.चे समन्वयक डॉ. एस. बी. राजमाने यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. उद्घाटन सत्राचे आभार प्रा. डॉ. के. जी. कांबळे यांनी मानले.

पहिल्या सत्रात 'ऑन-द-जॉब ट्रेनिंग, फिल्ड प्रोजेक्ट आणि रिसर्च प्रोजेक्ट' या विषयावर डी. आर. माने कॉलेज, कागलचे प्राचार्य डॉ. नंदकुमार एल. कदम यांनी मार्गदर्शन केले.

सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. उत्तम मोरस्कर होते. डॉ. एम. एन. मुजावर यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला, तर प्रा. कपिल टोपराणी यांनी आभार मानले.

दुसऱ्या सत्रात 'भारतीय ज्ञानप्रणाली' या विषयावर शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. केदार व्ही. मारुलकर यांनी मार्गदर्शन केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. अनिल सूर्यवंशी होते. डॉ. व्ही. एस. शिरगुरे यांनी आभार मानले.

कार्यशाळेच्या आयोजनासाठी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, सदस्य ॲड. वैभव पेडणेकर आणि ॲड. अमित बाडकर यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन डॉ. आर. जे. बिरजे आणि डॉ. सुरेखा सांगरूळकर यांनी केले.

कार्यशाळेच्या आयोजनासाठी उपप्राचार्य आर. एस. नाईक, सहसमन्वयक के. जी. कांबळे, ए. एस. बन्ने, एस. एस. देसाई, एन. एच. जाधव, के. डी. दिंडे, सीमा बेनाडे, पी. एन. देवळी, एस. व्ही. गवई, एम. एन. मुजावर, कपिल टोपराणी, प्रवीण सोरटे, माधुरी वाडकर, डॉ. व्ही. एस. शिरगुरे आणि प्रा. बी. ए. कश्यप यांनी सहकार्य केले.

कार्यशाळेस शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांमधून १३० हून अधिक शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.

1 6 SEP 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
ावाजी विद्यापीठ, कोल्हापू

विद्यापीठात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा; माती व कागदाच्या लगद्यापासून बनवल्या गणेशमूर्ती

# विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणरपूरक गणेशमूर्ती

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्यावतीने आयोजित पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत पर्यावरणपूरक गणेश मूर्तींची निर्मिती केली. त्याचबरोबर संशोधन पोस्टर व टाकाऊ वस्तूंपासून आवश्यक वस्तूंची निर्मिती स्पर्धाही उत्साहात पार पडल्या.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्याबरोबरच पर्यावरणविषयक संशोधन, सर्जनशीलता आणि शाश्वत विचारांना चालना देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेसह जागतिक ओझोन दिनानिमित्त संशोधन पोस्टर स्पर्धा आणि टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त



**शिवाजी विद्यापीठात आयोजित पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेत मूर्ती तयार करताना विद्यार्थीनी.**

वस्तू निर्मिती स्पर्धाही घेण्यात आल्या.

पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या वतीने भारतीय वातानुकूलन, उष्मा व शीतकरण अभियंता संस्था व आरएएसएसएएस यांच्या सहकार्याने आणि शाश्वतता मंडळाच्या माध्यमातून आयोजित या कार्यशाळेत कागदाचा लगदा व माती यांचा वापर करून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. कलाकार श्रद्धा शशिकांत पोंबुर्लेकर व स्वतंत्र व्यावसायिक कलाकार योगेश अरुण साटम यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेला ५५ पेक्षा अधिक विद्यापीठाबाहेरील सहभागींचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

. जागतिक ओझोन दिनानिमित्त 'पर्यावरणीय आव्हाने आणि शाश्वत उपाययोजना' या विषयावर संशोधन पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी पर्यावरणीय आव्हाने, संशोधन व नाविन्यपूर्ण उपाययोजना पोस्टरच्या माध्यमातून मांडल्या. तसेच टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून उपयुक्त व सर्जनशील वस्तू तयार करण्याची स्पर्धाही घेण्यात आली. संशोधन पोस्टर स्पर्धेसाठी डॉ. सुषमा पाटील व डॉ. चैताली बगाडे, तर टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त वस्तू निर्मिती स्पर्धेसाठी डॉ. दीप्ती एन. कुर्हे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, कराड येथील सहाय्यक प्राध्यापक डॉ. पुष्पलता घाटगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी कार्यशाळा व स्पर्धास्थळी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. बदलत्या हवामानासह पर्यावरणीय समस्यांचा सामना करण्यासाठी पर्यावरणपूरक व शाश्वत उपाययोजनांचा अवलंब करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.



**कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी तयार केलेली पर्यावरणपूरक गणेशमूर्ती.**

या उपक्रमांच्या आयोजनासाठी विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. सोनल चोंदे, डॉ. पल्लवी भोसले व डॉ. स्मिता पोरे यांनी नियोजन केले. संशोधन विद्यार्थी गौरी पवार, अमृता सूर्यवंशी तसेच पदव्युत्तर भाग-१ व भाग-२च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2026
पुढारी

# विद्यापीठात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, संशोधनवृत्ती व शाश्वत विचार रुजविण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा झाली. जागतिक ओझोन दिनानिमित्त संशोधन पोस्टर व टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त वस्तू निर्मिती स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पर्यावरणशास्त्र अधिविभाग, 'इशरे' व 'रास' यांच्या सहकार्याने व शाश्वतता मंडळाच्या माध्यमातून गणेशमूर्तीनिर्मिती कार्यशाळा घेण्यात आली. कागदाचा लगदा व मातीचा वापर करून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण कलाकार श्रद्धा शशिकांत पोंबुर्लेकर व योगेश अरुण साटम यांनी दिले. कार्यशाळेत ५५ हून अधिक सहभागी झाले. 'पर्यावरणीय आव्हाने व शाश्वत उपाययोजना' या विषयावर संशोधन पोस्टर स्पर्धा झाली. विद्यार्थ्यांनी पर्यावरणीय समस्या व नावीन्यपूर्ण उपाययोजना पोस्टरद्वारे मांडल्या. टाकाऊ वस्तूंच्या पुनर्वापरातून उपयुक्त वस्तू तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी उपक्रमस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. सोनल चोंदे, डॉ. पल्लवी भोसले व डॉ. स्मिता पोरे यांनी नियोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2026
सकाळ

# विद्यापीठात आर्थिक विषयांवर नावीन्यपूर्ण मांडणी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातील इकॉनॉमिक्स क्लबतर्फे पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा शुक्रवारी झाली. त्यात विद्यार्थ्यांनी विविध आर्थिक विषयांवर नावीन्यपूर्ण मांडणी केली. विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांच्या हस्ते आणि अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले. पोस्टर प्रेझेंटेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध आर्थिक, सामाजिक आणि समकालीन विषयांवर प्रभावी सादरीकरण केले. डॉ. कविता वड्राळे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. क्लबचे समन्वयक डॉ. डी. आर. ननवरे, दिग्विजय पाटील यांनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 SEP 2026 जनप्रवास

# अर्थशास्त्र अधिविभागात पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातील इकॉनॉमिक्स क्लबतर्फे पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी विविध आर्थिक विषयांवर नाविन्यपूर्ण मांडणी केली. विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांच्या हस्ते आणि अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

पोस्टर प्रेझेंटेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध आर्थिक, सामाजिक आणि समकालीन विषयांवर प्रभावी सादरीकरण केले. डॉ. कविता वड्राळे यांनी पंच म्हणून काम पाहिले. क्लबचे समन्वयक डॉ. डी. आर. ननवरे व डॉ. दिग्विजय पाटील यांनी संयोजन केले.



शिवाजी विद्यापीठाच्या इकॉनॉमिक्स क्लबतर्फे आयोजित पोस्टर स्पर्धेची पाहणी करताना सिद्धार्थ शिंदे.

16 SEP 2026
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
...वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा संपन्न

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातील इकॉनॉमिक्स क्लबतर्फे पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे शुक्रवार, दि. ११ रोजी आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी विविध आर्थिक विषयांवर नावीन्यपूर्ण मांडणी केली होती.

विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांच्या हस्ते आणि अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले.

डॉ. कविता वड्राळे यांनी पंच म्हणून काम पाहिले. क्लबचे समन्वयक डॉ. डी. आर. ननवरे व डॉ. दिग्विजय पाटील यांनी संयोजन केले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2026
पुढारी

# अर्थशास्त्र अधिविभागातील पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेस प्रतिसाद

**शिवाजी विद्यापीठातून...**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातील इकॉनॉमिक्स क्लबतर्फे पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी विविध आर्थिक विषयांवर नावीन्यपूर्ण मांडणी केली.

व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांच्या हस्ते व अधिविभाग प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्‌घाटन झाले.

पोस्टर प्रेझेंटेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध आर्थिक, सामाजिक आणि समकालीन विषयांवर प्रभावी सादरीकरण केले. डॉ. कविता वड्राळे यांनी पंच म्हणून काम पाहिले. क्लबचे समन्वयक डॉ. डी. आर. ननवरे व डॉ. दिग्विजय पाटील यांनी संयोजन केले.

16 SEP 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



ज्ञान-विज्ञान

डॉ. व्ही.एन. शिंदे

# शिकायला शिकलेले कुलोंब!

**यशस्वी होण्यासाठी काय गरजेचे आहे या प्रश्नाची तज्ज्ञ वेगवेगळी उत्तरे देतात. मात्र, याचे अचूक उत्तर आहे, यशस्वी होण्यासाठी शिकण्याची कला आत्मसात करणे गरजेचे आहे. आजच्या विद्यार्थ्यांनी ही गोष्ट आवर्जून लक्षात घ्यायला हवी. शिक्षण कोणत्याही विषयात घेतलेले असले आणि कुठल्याही वेगळ्या क्षेत्रात कार्य करण्याची वेळ आली तरी तो यशस्वी होतो, फक्त त्याला प्रश्न समजून घेणे आणि त्याचे उत्तर शोधण्याची क्षमता अंगी येणे गरजेचे असते. याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे फ्रेंच संशोधक चार्ल्स ऑगस्टिन डी कुलोंब!**

चार्ल्स कुलोंब यांचा जन्म १४ जून १७३६ रोजी एका सुसंस्कृत आणि सुखवस्तू कुटुंबात झाला. माता-पित्याकडील कुटुंबीय फ्रान्समधील बडी प्रस्थ होती. कायदा आणि व्यवस्थापनाच्या क्षेत्रात फ्रान्समध्ये कुलोंब यांच्या वडिलांचा शब्द प्रमाण मानला जात असे, त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी पॅरिसला स्थलांतर केले. पॅरिसमधील महाविद्यालयात कुलोंब यांचे शिक्षण सुरू झाले. भाषा, साहित्य, तत्वज्ञान, गणित, खगोलशास्त्र, रसायनशास्त्र आणि वनस्पतीशास्त्राच्या अध्ययनासाठी हे महाविद्यालय प्रसिद्ध होते. याच काळात त्यांच्या वडिलांचे गुंतवणुकीबाबतचे आडाखे चुकले. त्यांची सर्व संपत्ती गेली, त्यामुळे वडिलांनी पॅरिस सोडून मॉंटपेलिअरला जाण्याचा निर्णय घेतला. आईला हा निर्णय मान्य नव्हता. तिने पॅरिस सोडण्यास नकार दिला. चार्ल्स यांना आईचा निर्णय मान्य नव्हता, ते वडिलांसोबत गेले.

तेथे त्यांनी विज्ञान विषयात रूची घेतली. त्या काळात त्यांनी अनेक संशोधन निबंधांचे वाचन केले. १७६१ मध्ये ते पदवीधर झाले, मात्र त्यांना सैन्यात अधिकारी व्हावे असे मनापासून वाटे. त्यासाठी पदवी परीक्षा देताना, सैन्य महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी आणखी तयारी करणे त्यांना गरजेचे वाटले. त्यांनी खाजगी शिक्षकांकडून मार्गदर्शन घेतले आणि पदवी घेण्यापूर्वीच ते सैन्य महाविद्यालयाची परीक्षा उत्तीर्ण झाले. तेथे त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीच्या अभ्यासक्रमाची निवड केली. पूर्वीच विज्ञान शिक्षण घेतले असल्याने ते वर्षभरात अभियंता अभ्यासक्रम पूर्ण करून नोकरीसाठी पात्र ठरले. त्यांना लेफ्टनंट पदावर नियुक्ती देण्यात आली. सैन्यदलात त्यांना तटबंदी बांधणे, किल्ले बांधणे अशी कामे सोपवण्यात आली. त्यांची नियुक्ती वेस्ट इंडिज बेटांवर करण्यात आली. या बेटांना अन्य युरोपिय देशाकडून धोका असायचा. हा भूभाग सुरक्षित व्हावा या उद्देशाने तेथील संरक्षणव्यवस्था अधिक चांगली व्हावी अशी फ्रेंच सरकारची इच्छा होती. त्यासाठीच कुलोंब यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली होती. याचाच भाग म्हणून बोर्बन येथे एका नव्या किल्ल्याची बांधणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

या किल्ल्याच्या बांधकामाच्या वेळी कुलोंब यांच्या ज्ञानाचा कस लागला. त्यांच्या प्रात्यक्षिक कौशल्यातून हा किल्ला वर्षभरात बांधून पूर्ण झाला. त्या काळात हजारो गुलामांकडून काम करून घेतले जात असे. एका विशिष्ट वेळेनंतर या गुलामांना कितीही मारले तरी ते काम करू शकत नसत. याचा त्यांनी शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला. यावर त्यांनी शोधनिबंध तयार केला. त्यातील निष्कर्षानुसार, 'कोणताही मनुष्य शारीरिक कष्टाचे काम आठ तासांपेक्षा जास्त करू शकत नाही. तसेच बौद्धिक काम हे दहा तासांपेक्षा जास्त करू शकत नाही.' या किल्ल्याच्या बांधकामाच्यावेळी त्यांच्यावर अतिरिक्त ताण आला होता, त्यातून ते आजारी पडले. आजारपणामुळे ते फ्रान्सला परतले. फ्रान्समध्ये परतल्यावर त्यांनी चुंबकसूचीवर संशोधन केले आणि ते अॅकेडमीकडे पाठवले. या काळात त्यांचा यांत्रिकीवर संशोधन करण्याकडे कल होता. त्यांच्या चुंबकसूचीवर संशोधनास अॅकेडमीने पुरस्कार देऊन सन्मानित केले. चुंबकीय बले, पीळ, पीळाचा वजनकाटा, घर्षण, प्रत्यास्थशास्त्र या क्षेत्रात त्यांनी मोठे संशोधन केले. त्यांचे सैन्यदलातील कार्य आणि संशोधनातील गती पाहून त्यांच्यावर संरक्षण दलाच्या सक्षमीकरणासाठी आराखडा तयार करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. त्यांनी मनुष्यबळ नियोजनासोबत यंत्रसामुग्रीचा वापर करून संरक्षण व्यवस्था बळकट करण्यावर भर देणारा आराखडा सादर केला. तोच आराखडा फ्रान्स सरकारने स्वीकारला. फ्रान्सच्या अॅकेडमीने त्यांच्या यांत्रिकीवरील संशोधनाला दोनवेळा पुरस्कार दिले. आजारपणामुळे वेस्ट इंडिज बेटावर कार्यकाळ पूर्ण करू शकले नसले तरी त्यांनी वीस वर्षे सैन्यदलात नोकरी केली. त्यांनी विविध विषयांतील संशोधनपत्रिकांत शोधनिबंध प्रसिद्ध केले. यामध्ये यांत्रिकीसोबत उपकरणे आणि स्थापत्य अभियांत्रिकीवरही संशोधन केले. त्यांनी एकूण ३१० समित्यांवर काम केले. मात्र, अतिशय विद्वान असलेल्या कुलोंब यांच्या आयुष्यात आणखी एक मोठे वादळ निर्माण झाले. खरे तर त्यांची या समितीत कार्य करण्याची इच्छा नव्हती. कालवे दळणवळणासाठी गठित समितीचे सदस्य म्हणून कुलोंब यांचा समावेश करण्यात आला. अन्य दोन सदस्य रॉचेन आणि बोर्ड यांनी हा अहवाल फोडला. कुलोंब या समितीत अनिच्छेने आले असले तरी त्यांनी तो अचूक राहील याची दक्षता घेतली होती. या अहवाल फुटीने फ्रान्समध्ये मोठे वादळ निर्माण झाले. अन्य दोन्ही सदस्यांनी जबाबदारी कुलोंब यांच्यावर ढकलली. याची चौकशी होऊन कुलोंब यांना सात दिवसांचा तुरुंगवास भोगावा लागला. त्यानंतर या अहवालाचे महत्त्व अजानव्हिलर यांच्या लक्षात आला. त्यांनी राजदरबारात अहवालाचे कौतुक केले आणि त्याची अंमलबजावणी करण्यात आली. आजही राजवाडा आणि आजूबाजूच्या भागांतील पाणीपुरवठा कुलोंब यांच्या आराखड्यानुसारच होतो. मात्र, आराखडा स्वीकारल्यानंतर कुलोंब याना पॅरिसच्या जलव्यवस्थापनाची जबाबदारी सन्मानाने सोपवण्यात आली.

पुढे १७८९ मध्ये फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली. या काळात कुलोंब यांनी केवळ आपल्या संशोधनावर लक्ष केंद्रित केले. मांत्र, नव्या राज्यकर्त्यांनी अनेक संस्था बंद केल्या. काहींची पुनर्रचना केली. कुलोंब यांना या गोष्टी आवडत नव्हत्या, मात्र विरोध करून उपयोगही नव्हता. नव्या राज्यकर्त्यांनी त्यांच्याकडील सर्व पदेही काढून घेतली. या काळात त्यांनी पॅरिस सोडले आणि घरातून संशोधन करू लागले.

नव्या राज्यकर्त्यांचा राजकीय व्यवस्थेवर वचक होता. त्यांनाही विज्ञान आणि संशोधन हवे होते. त्यांनाही फ्रान्स सशक्त राष्ट्र म्हणून हवे होते. नवी प्रशासन व्यवस्था तयार झाल्यानंतर त्यांनी नव्याने संशोधनावर लक्ष केंद्रित केले. त्यातून भौतिकशास्त्र संशोधनासाठी संस्था स्थापन केली आणि १७९५ मध्ये तिचे प्रमुखपद कुलोंब यांच्याकडे देण्यात आले. कोणतेही हाती घेतलेले काम तन-मन-धन लावून पूर्ण करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. २३ ऑगस्ट १८०६ रोजी त्यांचे निधन झाले. एक स्थापत्य अभियंता, सैन्यदलातील अधिकारी, मनुष्यबळ व्यवस्थापनाचे मूलभूत तत्त्व मांडणारे व्यवस्थापक, चुंबकीय बलांवरील संशोधन करणारे संशोधक अजरामर झाले ते विद्युत क्षेत्रातील संशोधनामुळे!

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००